# लोकाभिमुख उपक्रम

लोकाभिमुख उपक्रम




# Pune's crime fix

## India Today Insight

***Against a national average of 379 crimes per 100,000 population, Pune's crime rate is below 150. This has been made possible by the police through a combination of public outreach and good old-fashioned beat policing.***

Pune is a metropolis with a population of 3.1 million and a 12,000-strong police force. Not nearly enough, but even so, since the start of the year, it has managed a quiet turnaround in the crime rate against women, down by 20 per cent compared to the same period in 2018. Against a national average of 379 crimes per 100,000 population, Pune's crime rate is now below 150 crimes. And this has been made possible by the city police through a combination of public outreach and good old-fashioned beat policing. Some of the credit also goes to the setting up of a special cell called 'Bharosa (trust)' to aid women, children and the elderly in distress. The cell, situated on the ground floor of the three- storied commissionerate building, works as a mediator between quarrelling couples and provides legal and psychological assistance to both women and men affected by domestic violence.

Pune police commissioner K. Venkatesham, a soft-spoken 1988 batch Maharashtra cadre officer, first shot to prominence after the Dalit protests and violence in Koregaon-Bhima near Pune on January 1, 2018 and the resultant crackdown on alleged Maoist sympathisers. The case led to arrests of ultra-Left sympathisers across the country. Even as Venkatesham continues to pursue cases against alleged Maoism sympathisers and activists like Sudha Bharadwaj, Varavara Rao, Vernon Gonsalves, Arun Fareira and Gautam Navlakha, the citizens outreach programme continues. The Bharosa cell receives an average of 50 applications every day from men and women. Complainants are allotted to one of six counselors to sort issues out amicably. If a solution seems impossible, the counselors help them get legal assistance to pursue their case in the courts. "In most cases, issues are sorted out here. This has helped us bring down the number of domestic violence cases," says inspector Vijaya Karande. Officers in the cell counsel juvenile delinquents with the help of an NGO. Five hundred delinquents have been counselled so far. The officers have also helped senior citizens in other areas, like facilitating their pensions and to get public utilities like cooking gas. Venkatesham has also strengthened the beat patrolling system. Beat marshals are asked to meet one history-sheeter a week in their areas to question him on his activities. The interview is played back to a superior officer. This, the commissioner says, serves twin objectives--history-sheeters are kept under watch and beat marshals get the confidence to confront hardened criminals. The results are visible already. The general crime rate has gone down by 15 per cent compared to the same period between May and June 2018.

A survey conducted by Pune-based Symbiosis School of Economics commends the Pune police. The survey, commissioned earlier this year, on citizens' perception of the police compared Nagpur between 2014 to 2017 to Pune in 2018. Nagpur was chosen for the comparison as Venkatesham had served there as commissioner before he was transferred to Pune in 2017. The rating was based on four parameters--law enforcement, providing security, punishment of culprits and social help of citizens.

The percentage of citizens who said police response has become better rose from 39 per cent in 2014 in Nagpur to 45 per cent in 2018 in Pune. In 2014, only 33 per cent citizens in Nagpur were aware about the police's role. It was 77 per cent in 2018 in Pune. In 2014, only 34 per cent citizens in Nagpur were willing to support the police. In 2018, 70 per cent of them in Pune were willing. In 2014, only 19 per cent citizens in Nagpur had a positive approach to the police. In 2018, the number was up to 67 per cent in Pune. Chief Minister Devendra Fadnavis is likely to release the report by the end of July.

Venkatesham has also created a transformation laboratory called Cops (Centre of Police Service) Excellence which puts policemen through courses like e-learning, strengthening digital sources, traffic management, personality development and achieving life-work balance through emotional intelligence techniques.

"A police commissioner and constable should be equals when it comes to becoming specialists," Venkatesham says. An urge to excel now motivates the team to go the extra mile. Pune suffers from an acute shortfall of CCTV cameras, there are only 900 whereas the requirement is a 100,000. In April, additional commissioner of police (crime) Ashok Morale geo-mapped all the private CCTV cameras in the city. This is so that the police can access CCTV footage of possible crime scenes. In the past two months, the police have also upped their case deduction rate, 48 crimes have been solved including two murders.

Sakal Times - 23 July, 2019

TIMES OF INDIA Date 23 July, 2019

SERVICE EXCELLENCE AND VICTIM ASSISTANCE SYSTEM

# Students call 28K citizens for feedback

ST CORRESPONDENT
reporters@sakaaltimes.com

**PUNE**
A total of 300 students under the National Service Scheme (NSS) called up about 28,000 visitors to police stations to know their feedback as part of the grievance redressal mechanism. They worked under the Service Excellence and Victim Assistance (SEVA) system which was started on September 1, 2018.

Till now 1.09 lakh people ed with the job to jot down details of every person visiting the police chowki or station. The constable has been given a tablet. He/she feeds the name, phone number and photo of the visitor. Using the data, a team sitting at the control room at the Police Commissioner's Office in Camp, calls up every person to know about their experience and whether they are satisfied with the services.

Additional Commissioner of Police (East Region) Sunil Phulari told reporters, "The aim is to take feedback of people within seven days about their experiences and whether their issues were resolved or not. Till now we have called up 1.05 lakh persons for their feedback and 1.01 lakh of them have given a positive review. Senior police officers are personally looking into issues of persons who were not satisfied with the response of the police station staffers."

Earlier the SEVA, which is the brainchild of Commissioner of Police Dr K Venkatesham, operated at the city. For better monitoring, there is a team of senior officers comprising Addl CP Phulari, DCP (Crime) Bachchan Singh and ACP (operations) Deepak Humbre and PSI Baban Gaikwad.

DCP Bachchan Singh said, "There were 5,000 persons who could not be contacted as their numbers were unreachable or wrongly fed in the system. As of now, 32 persons said that they were not satisfied with the response of police stations. Most people had their issues related to other departments like PMC, MSEDCL, courts etc."



**FOR CITIZENS:** A total of 300 students under the National Service Scheme have been pressed into service of SEVA to call visitors to police stations to know about their feedback. SAKAL TIMES

## STUDENTS PERFORM VITAL TASK

- The students were allotted different police stations after one-day training on July 17. The 300 students called up about 28,000 people in three days.

- Shivani Mule, a student from Garware College, who was allotted details of Deccan Gymkhana police station, said, "I was given a list of about 100 persons. I called them up to know their feedback and most of them were satisfied with the police response."

- Sohail Rafiq Sayyed of Jedhe College, who was allotted Khadak police station, added, "We got to know how police are functioning to resolve people's grievances. Of the total calls, about 10 per cent were not satisfied. Hence we escalated their issues to senior officers."

# Only 32 'not satisfied' with services at police stations

TIMES NEWS NETWORK

**Pune:** Around 300 students, volunteering for the National Service Scheme (NSS), called 28,000 people, who visited police stations for various purposes, to gather their feedback as a part of the grievance redressal mechanism initiated by the Pune city police under the Service Excellence and Victim Assistance (SEVA).

In the past 10 months, only 32 people, interviewed by the students, said that they were not satisfied with the police services. Police used the services of the students to get an impartial response from the citizens. The Pune police started SEVA on September 1, 2018, and till now, 1.09 lakh people visited 30 police stations and 102 police chowkeys.

Additional commissioner of police (east) Sunil Phulari said, "The aim is to gather feedback from people about their experiences. So far, we have called 1.05lakh people for their feedback and 1.01lakh of them have given positive reviews. Senior officers looked into the issues of people who were unsatisfied with the response they got at police stations."

DC (crime) Bachchan Singh said, "The NSS volunteers found that only 32 people were not satisfied with the response from police stations."

**सकाळ** – दि. २४ जुलै, २०१९

# पोलिसांच्या कामगिरीवर पुणेकर खूष

## पोलिस ठाण्यास भेट देणाऱ्या नागरिकांकडून घेतला आढावा

**पुणे, ता. २३ :** शहरातील पोलिस ठाण्यांना वेगवेगळ्या कामानिमित्त गेल्या ११ महिन्यांत भेट देणाऱ्या एक लाख नऊ हजार नागरिकांपैकी लाखभर नागरिक पोलिसांच्या कामगिरीवर खूष असून, केवळ ३४ नागरिक असमाधानी असल्याचा दावा पुणे पोलिसांनी केला आहे. पोलिस कर्मचाऱ्यांबरोबरच विविध महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मदतीने पोलिस ठाण्यांना भेटी देणाऱ्यांकडे विचारणा केल्यानंतर हा निष्कर्ष काढण्यात आला आहे.

पुणे पोलिस आयुक्तालयांतर्गतच्या सर्व पोलिस ठाण्यांना दररोज भेटी देणाऱ्या नागरिकांची नोंदणी व्हावी, त्यांचे प्रश्न सुटावेत, यासाठी पोलिस आयुक्त डॉ. के. वेंकटेशम यांनी एक सप्टेंबर २०१८ पासून 'सेवा ॲप' सुरू केले. पोलिस ठाण्यास भेट देणाऱ्या प्रत्येक नागरिकाची नोंद घेऊन दुसऱ्या दिवशी त्यांना फोन करून प्रश्न सुटला का? याबाबत नियंत्रण कक्षातील पोलिसाला विचारणा करण्यात आली.

नागरिकांशी संपर्क साधण्यासाठी शहरातील वेगवेगळ्या महाविद्यालयांच्या राष्ट्रीय सेवायोजनेतील विद्यार्थ्यांचीही मदत घेण्यात आली. या विद्यार्थ्यांनी २८ हजार नागरिकांशी फोनद्वारे संपर्क साधून त्यांच्या प्रश्नांबाबत विचारणा केली. संबंधित विद्यार्थ्यांशी अपर पोलिस आयुक्त सुनील फुलारी, गुन्हे शाखेचे पोलिस उपायुक्त बच्चन सिंग यांनी सोमवारी संवाद साधून त्यांच्या अनुभवांची नोंद घेतली.

> पोलिस ठाण्याला भेटी देणाऱ्या प्रत्येक नागरिकाची सेवा कार्यप्रणालीमध्ये नोंद घेतली जाते. दुसऱ्या दिवशी त्यांना फोन करून त्यांचा प्रश्न सुटला आहे का? याची विचारणा केली जाते. त्यामध्ये बहुतांश नागरिक समाधानी असल्याचे स्पष्ट झाले. केवळ ३२ नागरिक असमाधानी असून, त्यांच्या तक्रारी अन्य विभागांशी निगडित आहेत.
>
> – **सुनील फुलारी,** अपर पोलिस आयुक्त

> डेक्कन पोलिस ठाण्यास भेट दिलेल्या २०० लोकांशी मी फोनद्वारे संपर्क साधला. त्यापैकी बहुतांश नागरिक समाधानी होते. एक-दोन जण असमाधानी होते. परंतु, त्यांचेही काम पोलिसांच्या प्रक्रियेमध्ये होते.
>
> – **शिवानी मुळे, विद्यार्थिनी,** आबासाहेब गरवारे महाविद्यालय

**सेवा कार्यप्रणालीची सद्य:स्थिती**

| | |
|---|---|
| पोलिस ठाण्यांना भेट देणारे नागरिक | १,०९,२६४ |
| पोलिस/विद्यार्थ्यांनी नागरिकांना केलेले फोन | १,०५,१७० |
| पोलिसांबद्दल समाधानी असलेले नागरिक | १,०१,०४२ |
| संपर्क होऊ न शकलेले नागरिक | ४०९४ |

**पुढारी** – दि. २५ जुलै, २०१९

# ओळखपत्र असेल तरच पोलिस आयुक्तालयात प्रवेश

## सुरक्षेच्या दृष्टिकोनातून निर्णय; लवकरच प्रायोगिक तत्त्वावर अंमलबजावणी

**पुणे : प्रतिनिधी**

पोलिस आयुक्तालयाला येणाऱ्या प्रत्येक नागरिकाला आता ओळखपत्र देऊनच आत सोडले जाणार आहे. प्रत्येक विभागासाठी वेगवेगळे ओळखपत्र तयार करण्यात आलेले आहेत. ज्या विभागात काम असेल तेथीलच पास दिला जाईल. त्यामुळे नागरिकांना इतरत्र कोठेही जाता येणार नाही.

आलेल्या नागरिकांना शिस्त लागावी तसेच सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून प्रायोगिक तत्त्वावर हा उपक्रम राबविण्याची योजना असून, त्याची लवकरच अंमलबजावणी केली जाणार आहे.

पुणे पोलिस आयुक्तालयात पोलिस आयुक्त, सहआयुक्त, गुन्हे शाखा, विशेष शाखा, प्रशासन विभाग तसेच आर्थिक व सायबर गुन्हे शाखेचे उपायुक्त बसतात. पासपोर्ट, चारित्र्य पडताळणी,




परकीय नागरिक नोंदणी विभागही आहेत. तर, गुन्हे शाखेच्या सहायक आयुक्तांचे कार्यालयही याच ठिकाणी आहे.

स्थानिक पोलिस ठाणे स्तरावर असमाधानी असणारे तक्रारदार वरिष्ठांना भेटण्यास येतात; यातील अनेकजण आयुक्तालयात विनाकारण वेगवेगळ्या ठिकाणी फिरतात किंवा काम झाल्यावर रेंगाळत असतात. आता नागरिकांसाठी ओळखपत्राची योजना अंमलात आणण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

ज्या विभागात अथवा ज्या व्यक्तींना भेटायचे आहे, तेथीलच पास नागरिकांना देण्यात येईल. प्रवेशद्वारावर नाव व मोबाईल क्रमांक नोंदणी करून घेतला जाईल. त्यानंतर त्यांना ओळखपत्र दिले जाईल. त्यानंतर परत आल्यानंतर गेटवर पास जमा करावा लागेल, असे आयुक्तालयाकडून सांगण्यात आले.

# Pune police's initiatives part of community policing schemes of State cops

**MUBARAK ANSARI**
@VictrForceGhazi

Pune

After studying 67 community policing programmes across the police units in the state, the Maharashtra Police HQ has issued order to standardise the programmes considering changing crime scenario and needs of the society. Apart from the existing Mohalla committee/Peace committee, Mahila Suraksha Samiti, four other programmes will be implemented in all units.

These four are currently in operation in Pune like Bharosa Cell, Buddy Cop, Alert Citizen and Police Kaka/Didi.

In his standing order issued on June 15, DGP Subodhkumar Jaiswal stated, "There are more than 67 community policing programmes in various units of the State catering to different target groups. It has also been observed that programmes initiated with great fanfare fall into disuse over a period time with the change of guard. The needs, aspirations and requirements of the various groups of people have been changing over a period of time. It is the need of the hour that various schemes are reviewed regularly and standardised to address the changing crime scenario and the needs of the society." The police headquarters has instructed all units to follow general principles in community policing schemes. These include careful selection of manpower, training of personnel involved on the basis of standard guidebook to maintain the quality of the programme.

Sharing of best practices and unique experiences with others, is necessary. Systematic documentation to professionalise the services offered under these schemes will help in continuous improvement and suitable modification form time to time. This will also help in enhancement of public trust in the police and dissolve many misconceptions about the police work.

"All community policing schemes have to be oriented towards security, safety and service of people. They have to fulfil the gap between the aspirations as well as the needs of the community and the police services that the department is mandated to render by law."

Such schemes should be aimed at creating a positive impact on prevention of crime. ACP/ PI has to head the community policing cell (CPC) in Police Commissionerate's and districts respectively," the DGP order further states.

The Maharashtra Police Academy / Regional Police Training Centres will organise training programmes, workshops in best practices, counselling process etc. on regular basis.

Police Commissioner Dr K Venkatesham told Sakal Times, "All our initiatives have been included in the community policing schemes to be implemented all over the state."

This has increased our responsibility to perform well," he added.



**ALL SMILES:** State Chief Minister Devendra Fadnavis (C) had inaugurated the Bharosa Cell in Pune on January 9 this year.

## COMMUNITY POLICING SCHEMES

- **Bharosa Cell -** Growing urbanisation, migration of families to urban centres, increased number of nuclear families, non-availability of senior family members to guide, long working hours, ambitious couples, long digital life etc have increased problems in number of families. This has necessitated the need for multi-agency professional services from government agencies. Bharosa Cell will expand and professionalise services of the Women's Grievance Redressal Cell. Bharosa Cell will provide multiple services like counselling, legal assistance, police protection, medical help, psychological services, temporary shelter etc under one roof.
- **Senior Citizens Cell:** Migration of youths for education as well as for jobs in urban & semi urban areas and more and more nuclear families cause senior citizens to remain alone at homes and also has given rise to several issues like safety & security of senior citizens, property disputes in families, physical & mental harassment by family members & others, issues regarding services offered by various govt agencies such as banks, MSEDCL, treasury etc. Officers & men from the police stations have been instructed to visit at least five senior citizens every day to resolve their issues.
- **Special Juvenile Police Unit (SJPU) & CARE (Counselling And Reformative Education):** The SJPU is to be established under The Juvenile Justice (Care and protection of Children) Act, to maintain the continuity and standard procedure for protection and reformation of the Juveniles in conflict with Law and issues concerning children.
- **Police Kaka / Didi:** These days, students are exposed to various menaces such as eve teasing, ragging, drugs menace, cyber crimes & all forms of violence etc. These issues can harm their future permanently, if not helped out, in time. Police Kaka/Police Didi can offer them necessary assistance in such situations thereby creating police-student relationship based on mutual faith & trust. The examples of timely help by police will encourage other students to come forward to seek help.
- **Buddy Cop:** To provide a sense of security to working women, especially those working in IT industry who have to work in late night shifts, Buddy Cop initiative has been launched to provide 24x7 response system for protection and assistance to these working women.



# 'सी वॉच'च्या माध्यमातून ४८ गुन्हे उघडकीस

## ५७ लाखांपेक्षा अधिक रुपयांचा मुद्देमाल जप्त



**पुणे : प्रतिनिधी**

**पोलिसांनी शहरातील दुकानदार आणि सोसायट्यांतील नागरिकांच्या मदतीने हाती घेतलेल्या 'सी वॉच' उपक्रमातील तब्बल २७ हजार ५०५ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमुळे कायदा व सुव्यवस्था राखण्यास, गुन्हे उघडकीस आणण्यास मोठी मदत होत आहे. शहरातील गुन्हेगारी कारवायावर लक्ष ठेवण्याबरोबरच अनेक प्रकारच्या गंभीर गुन्ह्याची उकल होण्यास 'सी वॉच'चा हातभार लागत आहे.**

आतापर्यंत या उपक्रमाच्या माध्यमातून लष्कर आणि कोंढवा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील खूनाच्या दोन घटना उघडकीस आल्या आहेत; तसेच चोरी, घरफोडी याच्यासह अन्य प्रकारचे ४८ गुन्हे उघडकीस आणले गेले आहेत. विविध गुन्ह्यातील तब्बल ५७ लाखापेक्षा अधिक रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.

मुंढवा परिसरात काही महिन्यापूर्वी एका व्यक्तीचा डोक्यात दगड घालून दोघांनी खून केला होता. त्या ठिकाणी सी वॉच कॅमेऱ्यांची नजर होती. या फुटेजची पाहणी केली असता दोघे जण एका व्यक्तीच्या डोक्यात दगड घालत असल्याचे दिसून आले. खून झालेल्या व्यक्तीची ओळख निष्पन्न होईपर्यंत दोन्ही आरोपींना पोलिसांनी अटक केली होती. अशाच प्रकारच्या लष्कर आणि कोंढवा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील खुनाच्या दोन घटना उघडकीस आल्या आहेत. पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम आणि अपर पोलिस आयुक्त (गुन्हे) अशोक मोराळे हे स्वतः सी वॉच प्रकल्पात लक्ष घालून शहराचा अधिकाधिक भाग निगराणीखाली आणण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

**1** या उपक्रमासाठी पोलिसांनी दुकानदारांसह सोसायट्यांच्या परिसरात नागरिकांना सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यास विनंती केली होती. नागरिकांनीदेखील या उपक्रमाला प्रतिसाद देत कॅमेरे बसवून घेतले. त्यातील एका कॅमेऱ्याचा ॲक्सेस जीओ टॅक्निकद्वारे संबंधित पोलिस ठाण्याच्या किंवा मुख्य नियंत्रण कक्षाच्या सर्व्हरशी जोडण्यात आला. कॅमेरे बसवताना रस्त्यावरील सर्व घटना अचूक टिपल्या जातील, अशा पद्धतीने बसवण्यात आले आहेत. त्यामुळे कोणत्याही हालचाली या कॅमेऱ्याच्या नजरेतून सुटू शकत नाहीत.

**2** सर्वांत महत्वाचे म्हणजे यातील कोणतेही फुटेज पोलिस त्यांच्याकडे स्टोअर करत नाहीत. जेव्हा एखाद्या गुन्ह्याची माहिती पोलिसांना मिळते, त्यानुसार तो गुन्हा कोणत्या परिसरासह, कोणत्या पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडला आहे, हे पाहून तत्काळ त्या परिसरात सी वॉच उपक्रमात सहभागी असलेलेल्या कॅमेऱ्यांची पाहणी केली जाते. त्यामुळे अनेकदा गुन्हा झालेल्या ठिकाणाची प्रत्यक्ष माहिती या उपक्रमाच्या माध्यमातून पोलिसांना मिळते.

**3** व्यापाऱ्यांच्या मदतीने शहरातील वर्दळीचा लक्ष्मी रोड नुकताच सी वॉच प्रकल्पाच्या नजरेत आणला गेला आहे. यामुळे लक्ष्मी रस्त्यावरील गुन्हेगारीला प्रतिबंध करणे; तसेच अप्रिय घटनांवर लक्ष ठेवणे आता अधिक सोपे जाणार आहे.

पुढारी – दि. ७ जुलै, २०१९



# पोलिसांचा स्नेहमेळावा उत्साहात

**पुणे :** पुणे पोलिस दलातील १९९५ बॅचमधील कर्मचाऱ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात झाला. पोलिस आयुक्तालयात सहकुटुंब या स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम, अपर पोलिस आयुक्त अशोक मोराळे, पिंपरी-चिंचवडचे अपर पोलिस आयुक्त रामनाथ पोकळे, आर्थिक व सायबर शाखेचे पोलिस उपायुक्त संभाजी कदम यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या वेळी वाढत्या वयासोबत कर्मचाऱ्यांनी स्वत:च्या शरीराची तसेच कुटुंबीयांची काळजी घ्यावी, असा सल्ला देत कुटुंब, आप्तेष्ट व मित्र परिवार जीवनात किती महत्त्वाचे आहेत, याचे महत्त्व या वेळी अपर पोलिस आयुक्त रामनाथ पोकळे यांनी सांगितले.

प्रभात – दि. २२ जुलै, २०१९

# पोलीस आयुक्तांच्या हस्ते वृक्षारोपण...



**पुणे :** सामाजिक वनीकरण विभाग आणि राजभवन यांच्या संयुक्त विद्यमाने राजभवन येथील परिसरात पोलीस आयुक्त डॉ. के. वेंकटेशम यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी मान्यवर उपस्थित होते.

**पुढारी** – दि. ०२ जुलै, २०१९



पुणे पोलिस दलातील कर्मचाऱ्याला फीत लावताना कुटुंबीय व पोलिस आयुक्त व्यंकटेशम.

# पदोन्नत कर्मचाऱ्यांना कुटुंबीयांच्या उपस्थितीत फीत प्रदान सोहळा

## पोलिस आयुक्त व्यंकटेशम यांचा अनोखा उपक्रम

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे पोलिस दलातील ११६ कर्मचाऱ्यांची पदोन्नती झाल्यानंतर पहिल्यांदाच त्यांच्या कुटुंबीयांसमवेत या कर्मचाऱ्यांना पदानुसार सोमवारी फीत प्रदान करण्यात आली. फीत लावण्याचा मान त्यांच्या कुटुंबीयांना देण्यात आला. पोलिस आयुक्तांच्या या अनोख्या संकल्पनेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

पोलिस आयुक्तालयात सोमवारी हा कार्यक्रम पार पडला. या वेळी आयुक्त व्यंकटेशम यांच्यासह अतिरिक्त आयुक्त अशोक मोराळे, श्रीकांत तरवडे, उपायुक्त प्रसाद अक्कानवरू, बच्चनसिंग, शिरिष सरदेशपांडे, मितेश घट्टे, प्रकाश गायकवाड, स्वप्ना गोरे आदी या वेळी उपस्थित होते.

पोलिस शिपाई ते हवालदारांना पदोन्नती देण्यात आली. यात पोलिस नाईक, हवालदार, सहायक फौजदार अशी पदोन्नती झालेल्यांना सकुटुंब आयुक्तालयात आमंत्रित करण्यात आले होते. कर्मचारी अथवा अधिकारी पदोन्नती झाल्यावर त्याला फीत प्रदान करण्याचा कार्यालयीन कार्यक्रम राज्यात सर्वत्र होतो.

जनतेची सेवा करताना पोलिस स्वतःच्या कुटुंबाला वेळ देऊ शकत नाही. त्यामुळे पदोन्नतीच्या वेळी त्याचे कुटुंबीय उपस्थित असल्यास हा एक आनंदी सोहळा होऊ शकला, अशी कल्पना आयुक्त व्यंकटेशम यांनी मांडली होती, त्यानुसार सर्व कर्मचाऱ्यांना सहकुटुंब आमंत्रित करण्यात आले होते.

पदोन्नती झालेल्यांची जबाबदारी वाढली आहे. त्यांनी कुटुंबीयांचा प्राधान्याने विचार करून सर्व आमिषांना दूर ठेवत प्रामाणिक कर्तव्य बजवावे. त्यातूनच पोलिसांबद्दल सर्वसामान्य नागरिकांमध्ये विश्वास व आपुलकी निर्माण होईल, असे मत या वेळी आयुक्त व्यंकटेशम यांनी व्यक्त केले. महिला फौजदार देवधर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. उपायुक्त अक्कानवरू यांनी आभार मानले.

**महाराष्ट्र टाइम्स** – दि. २८ जुलै, २०१९

# 'आयटीयन्स' ठरला जखमीसाठी देवदूत

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

रात्रपाळी संपवून पहाटे घरी जाणाऱ्या तरुणाला वाघोलीतील रस्त्यावर गंभीर जखमी झालेली व्यक्ती निदर्शनास पडली. जखमींनी विव्हळणाऱ्या या व्यक्तीजवळ २० ते २५ बघे उभे होते. मात्र, त्यापैकी कोणीही मदतीसाठी पुढे येत नव्हते. जखमीची ती अवस्था पाहून त्या तरुणाने कोणताही विचार न करता संबंधिताला भाजी वाहतूक करणाऱ्या टेम्पोतून रुग्णालयात दाखल केले. वेळेत उपचार मिळाल्यामुळे जखमीचे प्राण वाचले.

## आकाश दत्तच्या धाडसामुळे मिळाले वेळेवर उपचार

जखमी व्यक्तीसाठी अक्षरशः देवदूत ठरलेल्या तरुणाचे नाव आहे आकाश दत्त... आकाशची तत्परता आणि माणुसकीमुळे जखमी राघव प्रतापसिंह यांचा पुनर्जन्म झाला आहे. आकाश मूळचा छत्तीसगडचा असून, तो पुण्यात 'क्वीकहिल टेक्नॉलॉजी'मध्ये सीएस एक्झिक्युटिव्ह म्हणून कार्यरत आहे. २३ मे रोजी आकाश रात्रपाळी संपवून पहाटे तीनच्या सुमारास वाघोलीतील घरी निघाला होता. त्याला खेळांचे सामान विकणाऱ्या एका मोठ्या शोरूमजवळ गर्दी आणि वाहतुकीची कोंडी झाल्याचे दिसले. दुचाकी बाजूला लावून त्याने पाहिले असता, एक व्यक्ती रस्त्यावर पडलेली दिसली. तिच्या डोक्याला जखम होऊन मोठ्या प्रमाणात रक्तस्राव होत असल्याचे पाहून आकाश कळवळला. त्या वेळी जवळपास २० ते २५ बघ्यांची गर्दी होती. मात्र, त्या पैकी एक जणही मदतीसाठी पुढे आला नाही. ते पाहून वेळ न दवडता आकाशने संबंधिताला उचलले. जवळ उभ्या असणाऱ्या महिला आणि पुरुषाच्या मदतीने जखमीच्या डोक्यावर स्कार्फ बांधला आणि अॅम्बुलन्सची वाट पाहात बसले. बराच वेळ होऊनही अॅम्ब्युलन्स येत नसल्याचे पाहून आकाशने जखमीला रुग्णालयात घेऊन जाण्यासाठी मदत मागण्यास सुरुवात केली. मात्र, कुणालाही दया आली नाही. अखेर भाजीपाला घेऊन जाणाऱ्या टेम्पोचालकाने त्यांचे ऐकून रुग्णाला वाघोली येथील खासगी रुग्णालयात दाखल केले.

डॉक्टरांनी लगोलग उपचारांना सुरुवात करून रक्तप्रवाह थांबविला. मात्र, खूप रक्त वाहून गेल्याने रुग्णाची प्रकृती गंभीर होती. त्यामुळे रुग्णाच्या नातेवाइकांना फोन करून कळविण्यात आले आणि संबंधिताला अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले. त्यानंतर सकाळ उजाडेपर्यंत आकाश रुग्णाजवळ थांबला होता. त्याच्या मदतीमुळे राघव यांचे प्राण वाचले.



रस्त्यावर जखमी अवस्थेत पडलेल्या व्यक्तीला त्वरित वैद्यकीय उपचार मिळवून देणाऱ्या आकाश दत्तचा पोलिस आयुक्त के. व्यंकटेशम यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

> “ अपघात झाल्यानंतर जखमीला मदत केल्यास पोलिस आणि अन्य गोष्टींचा ससेमिरा मागे लागेल, अशी भीती अनेकांना वाटते. मात्र, आता परिस्थिती बदलली आहे. मदत करणाऱ्या नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही, अशी तजवीज करण्यात आली आहे. तरीही नागरिकांच्या मनातील भीती कायम आहे. जखमी राघव यांची मदत केल्याने मला काहीही त्रास झाला नाही. उलट समाजातून माझे कौतुकच होत आहे. त्यामुळे नागरिकांनी अपघातामध्ये जखमी झालेल्यांना कोणाचीही वाट न पाहता तत्काळ हॉस्पिटलमध्ये दाखल करावे. तुमच्या मदतीमुळे एखाद्याचा जीव वाचू शकतो.
>
> – आकाश दत्त

### पोलिस आयुक्तांकडूनही कौतुक

आकाशने केलेल्या मदतीचे वृत्त 'सेव्ह लाइफ फाउंडेशन'ने पोलिसांपर्यंत पोहचले. त्यानंतर पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम् यांनी आकाशचे सन्मानचिन्ह देऊन कौतुक केले. या वेळी फाउंडेशनचे देवेंद्र पाठक, सहआयुक्त डॉ. रवींद्र शिसवे आदी उपस्थित होते. 'सेव्ह लाइफ फाउंडेशन' वाहतूक नियमांविषयी जनजागृती आणि अपघातग्रस्तांना मदत करण्याचे चांगले काम करीत आहे. सर्वच नागरिकांनी जबाबदारी ओळखून आपला वाटा उचलायला हवा, अशी अपेक्षा आयुक्तांनी व्यक्त केली.

प्रभात – दि. १३ जुलै, २०१९



# हुल्लडबाजी करणाऱ्यांवर कायद्याचा बडगा उगारू

## विद्यार्थी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्तांचा इशारा

पुणे, दि. १२ - पुण्यातील महाविद्यालयांत काही दिवसांवर विद्यार्थी निवडणुका खुल्या पद्धतीने पुन्हा होत आहे. त्यावेळी महाविद्यालय आवारातील विद्यार्थ्यांना शिक्षक नियंत्रणात ठेवू शकतील. मात्र, त्याचवेळी महाविद्यालय आवाराच्या बाहेर कायद्याची सीमारेषा ओलांडणारे आमचे 'कस्टमर' असतील, असा सूचक इशारा देत पुण्याचे पोलीस आयुक्त डॉ. के. वेंकटेशम यांनी महाविद्यालय प्रशासनास दिलासा दिला. त्यामुळे महाविद्यालय विद्यार्थी निवडणुकांच्या वेळी हुल्लडबाजी करणाऱ्यांवर कायद्याचा बडगा उगारला जाणार असल्याचे संकेत पोलीस आयुक्तांनी आज विद्यापीठाच्या कार्यक्रमात दिले.



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांचे सदस्य, विद्यापीठाचे अधिकारी, संलग्न प्राचार्य, प्राध्यापक यांच्याशी 'कायदा व सुव्यवस्था' या विषयावर डॉ. के. वेंकटेशम यांनी संवाद साधला. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर होते. याशिवाय प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, अतिरिक्त पोलीस आयुक्त अशोक मोराळे, विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेश पांडे, अधिसभेचे सदस्य संतोष ढोरे मंचावर उपस्थित होते.

यावेळी पोलीस आयुक्तांनी उत्तम कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस आणि विद्यापीठाने एकत्र येण्याची आवश्यकता असल्याचे नमूद केले. तसेच पोलीस आयुक्तांनी उपस्थितांना कायदा-सुव्यवस्थेच्या सद्यस्थितीची कल्पना दिली. याचबरोबर त्यांनी उपस्थितांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना उत्तरे दिली. शहराच्या गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस उपायुक्त शिरीष सरदेशपांडे यांनी पोलीस पुणे शहरात करत असलेल्या कामांबाबत आणि राबवत असलेल्या मोहिमांबाबत सादरीकरण केले.

कुलगुरू डॉ. करमळकर यांनी पोलीस आयुक्तांच्या सुसंवाद या उपक्रमाचे कौतुक केले. सामान्य माणूस डॉक्टर, पोलीस आणि न्यायालय यापासून दूर राहतो. मात्र, पोलीस आयुक्तांनी स्वतःहून अशा प्रकारचा कार्यक्रम आयोजित करण्याची इच्छा व्यक्त केली. त्यानुसार हा कार्यक्रम झाला. त्याचा सर्वांनाच लाभ झाला.

# 'दामिनी'चा चौथा वर्धापनदिन

पुणे, दि. १० - पुणे शहर पोलीस आयुक्त दलातील दामिनी पथकाचा चौथा वर्धापनदिन बुधवारी पार पडला. या वर्धापनदिनानिमित्त पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशन यांच्या अध्यक्षतेखाली आणि अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांच्या उपस्थितीत पोलीस आयुक्त कार्यालयात एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

दामिनी पथकात एकूण ३३ महिला कार्यरत असून १५ बीट मार्शल आहेत. कार्यक्रमामध्ये दामिनी पथक सुरू करण्यात आल्यापासून केलेल्या उपक्रमांची माहिती दाखविण्यात आली. सार्वजनिक वाहनात महिलांना होणारी छेडछाड रोखणे, खासगी कंपनीत काम करणाऱ्या महिलांना कायदा व सुरक्षेचे धडे देणे, महाविद्यालयीन मुलींना सेल्फ डिफेन्सबाबत मार्गदर्शन केले.

यावेळी वेगवेगळ्या पोलीस ठाण्यातील गुन्हे उघडकीस आणलेल्या सात महिला कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास सह.आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे, अपर पोलीस आयुक्त अशोक मोराळे, पोलीस उपायुक्त शिरीष सरदेशपांडे, सहायक पोलीस आयुक्त भानुप्रताप बर्गे, पोलीस निरीक्षक विजया कारंडे, सहायक पोलीस निरीक्षक स्वाती केदार, पोलीस उपनिरीक्षक प्रिया टिळेकर आदी उपस्थित होते.




पुणे : पुणे शहर पोलीस आयुक्त दलातील दामिनी पथकाचा चौथा वर्धापन दिन उत्साहात पार पडला. यावेळी दामिनी पथकातील महिला पोलिसांनी अभिनेत्री मृणाल कुणकर्णी सोबत सेल्फी घेतला. यावेळी पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशन व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.


प्रभात – दि. १२ जुलै, २०१९

# ... अखेर पोलिसांनीच काढले ते फ्लेक्स

## महापालिका प्रशासन कारवाई करत नसल्याने उचलले पाऊल

**पुणे, दि. ११ -** शहराला विद्रूप करणारे फ्लेक्स काढण्याची जबाबदारी महापालिकेची आहे. मात्र, महापालिका त्याकडे दुर्लक्ष करते. कारवाई केलीच तर एखादी दुसरी कारवाई करून पुन्हा काही महिने संबंधित परिसरात महापालिकेचे पथक फिरकतही नाही. यामुळे फ्लेक्स बाजांचे चांगलेच फावते. फ्लेक्सने केवळ शहरातील चौकांचे विद्रूपीकरण होते असे नाही, तर फ्लेक्स बाजीतून गुन्हेगारीचे उदात्तीकरणही झालेले दिसते. गुन्हेगार आणि राजकीय कार्यकर्त्यांच्या फ्लेक्स बाजीतून काही मारहाणीच्या आणि दहशत माजवण्याच्या घटनाही घडल्या आहेत. या घटनांमुळे अनेकदा कायदा सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण झाली आहे. ही बाब लक्षात घेता महापालिकेने फ्लेक्स बाजीचा विषय गांभीर्याने घेणे आवश्यक आहे. मात्र, अनेकदा पोलिसांनी पत्र देऊनही महापालिका कारवाई करत नाही. यामुळे दत्तवाडी पोलिसांनी नाईट शिफ्टमध्ये हे स्वत: हे फ्लेक्स टराटरा फाडत काढले आहेत.

अनेकदा चौकातील सर्वच जागा फ्लेक्सने व्यापलेल्या असतात. यामुळे शहराचे विद्रूपीकरण तर



होतेच शिवाय वाहनचालकांचे लक्षही विचलीत होते. अनेक फ्लेक्स तर सिग्नल यंत्रणा झाकूण टाकणारे असतात. फ्लेक्स लावण्यावरून अनेकदा चढाओढ होत असताना दिसते. राजकीय पक्षांचे कार्यकर्ते तसेच गुन्हेगार फ्लेक्स बाजीतून परिसरात स्वत:चे वर्चस्व असल्याचे दाखवतात. दत्तवाडी, ताडीवाला रोड ,सिंहगड रस्ता, उपनगरांमध्ये तसेच शहराच्या काही मध्यवर्ती भागात मोठ्या प्रमाणात अशी फ्लेक्स बाजी दिसते. महापालिका महिन्या दोन महिन्याने कारवाई करून फ्लेक्स काढते. मात्र, कारवाईत सातत्य नसते. तर काहीवेळा राजकीय पदाधिकारी कारवाईत अडथळा आणतात. सध्यातर वाढदिवसानिमीत्त फ्लेक्सबाजीचे पिकच आले आहे.

### दत्तवाडी पोलिसांनी घेतला पुढाकार

दत्तवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतही अशाचप्रकारे फ्लेक्सबाजीला उधाण आले होते. यासंदर्भात पोलिसांनी अनेकदा महापालिकेला पत्रही लिहले होते. मात्र, अखेर दत्तवाडी पोलिसांनी पुढाकार घेत नाईट राऊंडला हे फ्लेक्स काढून टाकले. यासंदर्भात वरिष्ठ पोलीस निरीक्षक देवीदास घेवारे यांनी सांगितले, पोलीस ठाण्यात नागरिकांशी संवाद साधताना अनेकदा चौकात लावल्या गेलेल्या फ्लेक्स संदर्भात विषय निघतो. त्यामुळे शहराचे विद्रूपीकरण होत असल्याचे सांगितले जाते.

महाराष्ट्र टाइम्स – दि. १५ जुलै, २०१९

# महिलांसाठी आयुक्तालयात 'SHE टीम'

**हैदराबाद येथे यशस्वी झाल्यानंतर पुण्यात योजना**

म. टा. प्रतिनिधी, पुणे

हैदराबाद येथे महिला सुरक्षेसाठी स्थापन केलेले 'सिक्युरिटी ऑफ हर एन्शुअर्ड' (एसएचई ) टीम यशस्वी ठरल्यानंतर आता पुणे पोलिस आयुक्तालयात देखील ही टीम तयार केली जाणार आहे. पीडित महिला व पोलिस यांच्यात दुवा म्हणून साध्या वेशात काम करणे, छेडछाडीची ठिकाणे निश्चित करणे, फोन, सोशल मीडियाच्या माध्यमातून महिलांना त्रास देणाऱ्यांवर कारवाई करणे अशी कामे या टीमची राहणार आहेत.

महिलांवर होणारे अत्याचार, प्रत्यक्ष व सायबर माध्यमामार्फत होणारे छेडछाडीचे प्रकार रोखण्यासाठी आणि महिलांना समाजात ताठ मानेने जगता यावे म्हणून हैदराबाद येथील पोलिस आयुक्त महेंदर रेड्डी यांनी २०१४ मध्ये 'शी' टीमची स्थापना केली होती. या टीममध्ये हैदराबाद पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत महिलांसाठी खूपच चांगले काम केले. त्यामुळे महाराष्ट्रातील मोठ्या शहरात महिलांच्या सुरक्षेसाठी काम करणारी अशा प्रकारची टीम असावी, अशी संकल्पना पुढे आली. त्यानुसार राज्याच्या गृह विभागाने पुणे पोलिसांना अशी टीम तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार पोलिस आयुक्तालयातील प्रत्येक झोनमध्ये ही टीम तयार केली जाणार आहे. या टीमवर अतिरिक्त पोलिस आयुक्त व पोलिस उपायुक्त यांचे नियंत्रण राहणार आहे. या टीमसाठी प्रत्येक पोलिस ठाण्यातील उपनिरीक्षक दर्जाचा अधिकारी, दोन पुरुष व एक महिला कर्मचाऱ्यांची नावे व फोन क्रमांक भरोसा सेलच्या महिला सहायता कक्षाकडे पाठविण्याच्या सूचना पोलिस ठाण्यांच्या प्रमुखांना करण्यात आल्या आहेत.

'शी' टीमचा जागरूकता अभियान व छेडछाड विरोधी मोहीम हे महत्त्वाचे भाग राहणार आहेत. बसस्थानक, महाविद्यालये, वसतिगृह, दुकाने, मॉल अशा ठिकाणी ही टीम जागरुकता करणार आहे. महिला सुरक्षेसाठी पोस्टर, पत्रके, स्टीकर्स वितरीत केली जातील. लघुपट, शी टीमचे गाणे तयार केले जाईल. ते चित्रपटगृहात देखील दाखविले जाईल. महिलांना त्रास देणाऱ्याची माहिती देण्यासाठी नागरिकांना प्रोत्साहित केले जाईल. माहिती देणाऱ्या व्यक्तीची ओळख गुप्त ठेवली जाईल. त्यामुळे सार्वजनिक ठिकाणी व सोशल मीडियावरून महिलांना त्रास देणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. हैदराबादमध्ये महिलांना त्रास देणाऱ्यांच्या मनात 'शी' टीमची भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे पुण्यातदेखील अशाच पद्धतीने या टीमला काम करावे लागणार आहे.




### टीमची रचना

'शी' टीमचा प्रमुख हा सहायक निरीक्षक अथवा उपनिरीक्षक असणार आहे. त्यांच्याकडे तीन कर्मचारी असतील. त्यामध्ये किमान एक महिला कर्मचाऱ्यांचा सहभाग असणे आवश्यक असून, टीममधील अधिकारी व कर्मचारी साध्या वेशात राहतील. त्यांच्याकडे कॅमेरा असणार आहे. घडणाऱ्या घटनांचे रेकॉर्डिंग ही टीम करणार आहे.

### टीमचे काम

- छेडछाडीस प्रतिबंध, सार्वजनिक ठिकाणी महिलांचे लैंगिक छळ रोखणे.
- फोनवरून, मेसेज,ई-मेल, सोशल मीडियाद्वारे महिलांना त्रास देणाऱ्या गुन्हेगारांवर कारवाई करणे.
- महिलांना वेळेत मदत मिळवून देणे.
- गंभीर गुन्ह्यांच्या प्रसंगी एक प्रतिबंधत्मक टीम म्हणून काम करणे.
- दिशाभूल झालेल्या तरुणांना सुधारणे. त्यांना परिणावद्दल जागरूक करणे.

महाराष्ट्र टाइम्स – दि. ९ जुलै, २०१९

# ‘सायबर गुन्हे रोखण्यासाठी जनजागृती महत्त्वाची’

**पुण्यात सायबर गुन्हेगारीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून, ऑनलाइन फ्रॉड तसेच सोशल मीडियावरून होणारे गुन्हे यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी पुणे पोलिसांकडून सायबर सेल सुरू करण्यात आला असून, त्याला पोलिस ठाण्याचे स्वरूप देण्यात आले आहे. या पोलिस ठाण्याला गुन्हे दाखल करण्याचे अधिकार मिळाले असून, याबाबत राज्यात मुंबईनंतर पुणे दुसऱ्या क्रमांकाचे शहर ठरले आहे. याबाबत सायबर सेलचे पोलिस उपायुक्त संभाजी कदम यांच्याशी श्रीकृष्ण कोल्हे यांनी केलेली बातचीत.**



**■ सायबर गुन्हे दाखल करण्यास पुणे पोलिसांना परवानगी मिळाली आहे. त्याविषयी काय सांगाल?**

- शहरात सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वाढत असल्याचे लक्षात घेऊन पोलिसांकडून त्यावर विविध उपाययोजना केल्या जात आहेत. पुणे शहराला सायबर पोलिस ठाणे मिळावे आणि त्याला गुन्हे दाखल करण्यास संमती मिळावी, यासाठी प्रयत्न सुरू होते. कोर्ट मंजूर झाल्यानंतर सायबर पोलिस ठाण्याला गुन्हे दाखल करण्यास परवानगी मिळाली आहे. त्यानुसार आतापर्यंत आठ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. किचकट, संवेदनशील, जास्तीत जास्त तंत्रज्ञानाचा वापर करावा लागेल, अशा गुन्ह्यांचा तपास सायबर पोलिसांतर्फे केला जाणार आहे. तर, इतर गुन्हे सायबर पोलिस ठाण्यात दाखल करून ते पोलिस ठाण्यांकडे पाठविले जात आहेत. त्यांना सायबर पोलिस ठाण्यांकडून तपासात सहकार्य केले जात आहे. दर आठवड्याला या गुन्ह्यांचा आढावा घेतला जात आहे.

**■ सायबर गुन्हे वाढत असल्याने त्याला आळा घालण्यासाठी काय उपाययोजना केल्या जात आहेत?**

- पुणे व पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालय एकत्र असताना गेल्या वर्षी पाच हजार ५०० सायबर गुन्ह्यांचे अर्ज आले होते. या वर्षी जूनपर्यंत तीन हजार २०० अर्ज आले आहेत. त्यामुळे सायबर क्राइम वाढत असल्याचे दिसून येत आहे. त्यानुसार सायबर पोलिस ठाण्याची पथके तयार केली असून, ती पथके गुन्ह्याचा तपास करीत आहेत. तसेच, गुन्ह्यांचा तपास कसा करावा यासाठी एक निश्चित प्रक्रिया (एसओपी) तयार करण्यात येत आहे. तसेच, सायबर गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी पोलिस ठाण्यांना मार्गदर्शन केले जात आहे.

**■ सायबर सेलकडून कोणते वेगळे उपक्रम केले जात आहेत?**

- सायबर गुन्ह्यांसाठी आपल्याकडे अद्ययावत अशी सायबर लॅब आहे. या ठिकाणी पोलिसांना सायबर गुन्ह्यांबाबत प्रशिक्षण दिले जाते. तसेच, पोलिस ठाण्यांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना सतत प्रशिक्षण दिले जाते. त्याबरोबर गुन्ह्यांत ऑनलाइन पैसे गेलेल्यांना बँकामार्फत पैसे परत मिळवून दिले जात आहेत. गेल्या सहा महिन्यांत नागरिकांना सहा कोटी रुपये परत मिळवून दिले आहेत. सायबर गुन्ह्यांसाठी देशातील कोणते हॉटस्पॉट आहेत, त्याची माहिती काढण्यात आली आहे. त्या ठिकाणच्या पोलिसांसोबत संपर्क ठेवून आरोपींना अटक करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

मटा टॉकटाइम

**■ सायबर गुन्ह्यांत डिटेक्शनबरोबरच जनजागृती महत्त्वाची असते, त्यासाठी काय केले जात आहे?**

- सायबर गुन्हे रोखण्यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती करणे खूपच महत्त्वाचे आहे. त्यासाठी सायबर पोलिसांकडून प्रत्येक आठवड्यात शाळा, महाविद्यालयांमध्ये जाऊन सायबर गुन्ह्यांवर मार्गदर्शन केले जाते. नागरिकांनी सोशल, ऑनलाइन फ्रॉड, डेबिट-क्रेडिट कार्ड फ्रॉडच्या गुन्ह्यात काय काळजी घेतली जावी, याची माहिती सतत प्रसारित केली जाते. त्यासाठी हँडबुक देखील छापले असून, ती नागरिकांना वितरित केली जातात. तसेच, त्याची माहिती सोशल मीडियावरून नागरिकांना दिली जाते. सायबर पोलिसांनी यू-ट्यूब चॅनलदेखील सुरू केले असून, त्या ठिकाणी काय काळजी घ्यावी, याची माहिती दिली आहे.

**■ सुरक्षिततेच्या दृष्टीने नागरिकांना काय आवाहन कराल?**

- नागरिकांनी ऑनलाइन खरेदी करताना विशेष काळजी घ्यावी. अनोळखी व्यक्तीशी आर्थिक व्यवहार करू नये. सोशल मीडियावर वैयक्तिक माहिती शेअर करू नका. ‘ओएलएक्स’वरून गुन्हे वाढत आहेत. त्यामुळे, वस्तू खरेदी करताना त्या व्यक्तीला प्रत्यक्ष भेटा. नंतरच पुढील व्यवहार करा.

मॅट्रोमोनी साइटवरून देखील फसवणुकीचे प्रकार समोर येत आहेत. त्यामुळे कोणाच्या भूलथापांना बळी पडू नका. बँकेची वैयक्तिक माहिती कोणालाही शेअर करू नका. सायबर गुन्ह्यात कोणाची फसवणूक झाल्यास तत्काळ सायबर सेल अथवा स्थानिक पोलिसांकडे संपर्क साधा.

- सायबर पोलिस ठाणे, पोलिस मुख्यालय, शिवाजीनगर
- फोन क्रमांक - ०२०-२९७१००९७
- ई-मेल - crimecyber.pune@nic.in

महाराष्ट्र टाइम्स – दि. १५ जुलै, २०१९

# सायबर फौजा शहरात सज्ज

## वाढत्या गुन्ह्यांच्या तपासासाठी विभागवार पाच पथकांची स्थापना



Shrikrishna.Kolhe
@timesgroup.com
Tweet : @ShrikrishnaKMT

**पुणे :** शहरात सायबर गुन्ह्यांची संख्या झपाट्याने वाढत असून, त्यांचा तपास करण्यासाठी विभागवार पाच विशेष तपास पथके स्थापन करण्यात आली आहेत. त्यामुळे सायबर गुन्ह्यांना आळा बसण्यास मदत होणार आहे.

पुणे शहरात सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वेगाने वाढत असून, मुंबईच्या खालोखाल सर्वाधिक गुन्ह्यांची नोंद पुण्यात होत आहे. त्यासाठी यापूर्वीच सायबर सेलची स्थापना करण्यात आली आहे. सायबर सेल त्यांच्याकडे आलेल्या तक्रारींचा तपास करून गुन्हे दाखल करण्यासाठी पोलिस ठाण्यांकडे पाठवत होते. त्यामुळे सायबर पोलिस ठाणी सुरू करण्याची मागणी पुढे आली. राज्यात मुंबईनंतर पुण्यात सायबर पोलिस ठाणे सुरू झाले. या ठाण्यांना गुन्हे दाखल करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. त्यानुसार सायबर पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करून किचकट गुन्हे त्यांच्याकडे तपासासाठी ठेवले जातात आणि अन्य गुन्हे पोलिस ठाण्यांकडे पाठविले जातात.

**मटा विशेष**

पुणे शहरात दरवर्षी जवळपास साडेपाच हजार सायबर गुन्ह्यांचे अर्ज दाखल होतात. यंदा पहिल्या सहा महिन्यातच साडेतीन हजारांच्या आसपास सायबर गुन्ह्यांचे अर्ज दाखल झाले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने डेबिट-क्रेडिट कार्डची माहिती चोरून होणारी फसवणूक, ओटीपी क्रमांक मिळवून होणारी फसवणूक, ऑनलाइन खरेदीतील फसवणूक, सोशल मीडियावरून होणारी फसवणूक, डेटा थेफ्ट, हॅकिंग, मोबाइलवरून होणाऱ्या गुन्ह्यांचा समावेश आहे. गुन्ह्यांच्या प्रकारानुसारच सायबर सेलमध्ये नवीन पाच पथके तयार करण्यात आली आहेत. या पथकांना प्रकारानुसार नावे देण्यात आली आहेत. या पथकांचे प्रमुख पोलिस निरीक्षक असून, त्यांना सहायक निरीक्षक किंवा उपनिरीक्षक आणि दोन कर्मचारी देण्यात आले आहेत. ही पथके पोलिस ठाण्यांना पाठविलेल्या गुन्ह्यांत तपासकामी मदत करतील, अशी माहिती सायबर सेलचे पोलिस उपायुक्त संभाजी कदम यांनी दिली.

> “ सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वाढत असल्याने त्यांना आळा घालण्यासाठी पाच विशेष पथके तयार करण्यात आली आहेत. त्या पथकांकडे नेमून दिलेलीच कामे असतील. तसेच, ही पथके गंभीर गुन्ह्यांमध्ये पोलिस ठाण्यांना मार्गदर्शन करतील.
>
> – संभाजी कदम, पोलिस उपायुक्त, सायबर सेल



### अशी असतील नवी पथके

- **ऑनलाइन फसवणूक :** डेबिट-क्रेडिट कार्डचा वापर करून फसवणूक, ओटीपी शेअर फ्रॉड, जॉब, इन्शुरन्स, कर्ज, मॅट्रिमोनी, मोबाइल टॉवर फ्रॉड, हॉलिडे पॅकेज फ्रॉड.
- **ऑनलाइन व्यवसाय फसवणूक :** ओएलएक्स, क्विकर, फ्लिपकार्ट, ऑनलाइन खरेदी आणि विक्री, मल्टिलेव्हल मार्केटिंग.
- **डेटा थेफ्ट आणि हॅकिंग :** हॅकिंग वेबसाइट, ई-मेल, व्हॉट्सॲप हॅक करून खंडणी उकळणे, डेटा थेफ्ट, सोर्सकोड थेफ्ट.
- **सोशल नेटवर्किंग :** फेक प्रोफाइल, सोशल मीडियावर बदनामी, अकाउंट हॅक करून खंडणी, बदनामी करणारे व्हिडिओ टाकणे, दोन जातीत तेढ निर्माण करणाऱ्या पोस्ट आणि फोटो टाकणे, फेक मेल, फोटो मॉर्फ करणे.



- **मोबाइल गुन्हे :** पोस्ट व्हॅल्यू मेसेज, धमकी देणारे कॉल करणे, मोबाइल हॅकिंग, मॅन इन मिडल, बोगस वेबसाइट, डिजिटल सिग्नेचर चोरणे, आदी.

महाराष्ट्र टाइम्स – दि. ४ जुलै, २०१९

# कामगार मृत्यूप्रकरणी होणार धोरणनिश्चिती

## पोलिस उपायुक्तांच्या देखरेखीखाली पथक स्थापन

म. टा. प्रतिनिधी, पुणे




शहरात एकापाठोपाठ एक घडणाऱ्या घटनांमध्ये कामगारांचे मृत्यू होत असताना दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई होणे अपेक्षित आहे. ही कारवाई करण्यासाठी धोरण निश्चितीची आवश्यकता असून, त्यासाठी पुणे पोलिसांनी पोलिस उपायुक्तांच्या नेतृत्वाखाली तपास पथक तयार केले आहे. हे पथक महापालिका, कामगार आयुक्तांच्या कायद्यांचा अभ्यास करून धोरण निश्चित करणार आहे.

गेल्या दोन ते तीन दिवसांत कोंढवा आणि आंबेगाव येथे सुरक्षा भिंत कोसळून २१ कामगारांचा मृत्यू झाला आहे. या घटनांमध्ये कामगारांच्या सुरक्षेसाठी बिल्डरने कोणत्याही उपाययोजना केल्या नसल्याचे आढळून आले होते. तसेच, कामगारांची कामगार आयुक्त, कामगार महामंडळ यांच्याकडे नोंदणीही केली नसल्याचे आढळून आले होते. शहरात दर वर्षी अशा घटना घडत असून, त्यामध्ये निष्पाप कामगार बळी पडत आहेत. अशा घटना घडल्यानंतर पोलिसांकडून भारतीय दंड संहिता कलम ३०४ नुसार सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला जातो. मात्र, केस कोर्टात उभी राहिली असता, बिल्डर जामिनावर बाहेर पडत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे त्यांच्यावर कायद्याचा वचक राहत नाही. बिल्डरने कामगारांना महापालिका आणि कामगार कायद्यानुसार सुविधा पुरवणे अपेक्षित आहे. मात्र, कामगारांच्या सुरक्षेच्या दृष्टीने कोणताही विचार होत नसल्याचे दिसून आले आहे.

बिल्डर नेहमीच कामाचा ठेका अन्य ठेकेदारांना देऊन बांधकाम प्रकल्पावर होणाऱ्या दुर्घटनेची जबाबदारी त्यांच्यावर ढकलून मोकळे होतात. त्यामुळे अशा प्रकारचे गुन्हे झाल्यास ते कायदेशीरदृष्ट्या मोकाट राहतात. त्यामुळे कायद्यातील पळवाटा बंद करण्यासाठी पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांनी खास पथक तयार केले आहे. झोन पाचचे पोलिस उपायुक्त सुहास बावचे यांच्या नेतृत्वाखाली एका पोलिस निरीक्षकाची नेमणूक करण्यात आली आहे. त्याकामी स्ट्रक्चरल इंजिनियर, वकील यांचीही मदत घेतली जाणार आहे. हे पथक कामगारांच्या सुरक्षेबाबत महापालिकेच्या, कामगारांच्या कायद्यात काय तरतुदी आहेत, सध्या कोणत्या सुविधा दिल्या जातात, गुन्हा कशापद्धतीने दाखल करावा, सध्याच्या त्रुटी काय आहेत, त्याचा बिल्डर कसा फायदा उठवतात याचा अभ्यास करण्यात येणार आहे. त्यानुसार पोलिसांनी कारवाई करण्याचे निश्चित धोरण तयार केले जाईल. शहरात अशा दुर्घटना घडल्यास धोरणानुसार गुन्हा दाखल केला जाणार आहे.



बिल्डरांच्या निष्काळजीपणामुळे शहरात कामगारांचे मृत्यू होत आहेत. या प्रकरणी आरोपींवर गुन्हानिश्चिती करून कडक कारवाई करण्यासाठी या पथकाची निर्मिती करण्यात आली आहे. हे पथक पुढील काही दिवसांमध्ये सर्व गोष्टींचा अभ्यास करून धोरण निश्चित करील. भविष्यात पुन्हा अशा प्रकारच्या घटना घडल्यास या धोरणानुसार कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. कामगारांना जास्तीत जास्त सुविधा मिळाव्यात यासाठी पोलिसांकडून प्रयत्न सुरू आहेत.

– डॉ. के. व्यंकटेशम, पोलिस आयुक्त, पुणे

महाराष्ट्र टाइम्स – दि. १३ जुलै, २०१९

# सुशिक्षितांचे गुन्हेगारीकडे वळण्याचे प्रमाण वाढले

## पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांचे मत

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'सुशिक्षितांचे गुन्हेगारीकडे वळण्याचे प्रमाण वाढत असून, ती आपल्यासाठी एक प्रकारे धोक्याची घंटा आहे. सायबर क्राइम आणि आर्थिक गुन्ह्यांमध्ये सहभागी होणारे अनेक गुन्हेगार सुशिक्षित असल्याचे तपासातून निष्पन्न झाले आहे. त्यामुळे पोलिस आणि शिक्षण क्षेत्र एकत्र आल्यास असे गुन्हे रोखण्यासह कायदा-सुव्यवस्था राखण्यास मदत होईल,' असे मत पुण्याचे पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांनी शुक्रवारी व्यक्त केले. दरम्यान, आगामी महाविद्यालयीन निवडणुका शांततेत होण्यासाठी कॉलेजांना सुरक्षा व्यवस्था पुरविण्याच्या प्रश्नाबाबत केवळ 'ठीक आहे' असे उत्तर डॉ. व्यंकटेशम यांनी देऊन सविस्तर बोलण्याचे टाळले.

डॉ. के. व्यंकटेशम यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांचे सदस्य, अधिकारी, कॉलेजांचे प्राचार्य, प्राध्यापक यांच्याशी 'कायदा व सुव्यवस्था' या विषयावर संवाद साधला. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर होते. याशिवाय उपकुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, अतिरिक्त पोलिस आयुक्त अशोक मोराळे, विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेश पांडे, अधिसभेचे सदस्य संतोष ढोरे उपस्थित होते. गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलिस उपायुक्त शिरीष सरदेशपांडे यांनी पोलिस पुणे शहरात करत असलेल्या कामांबाबत आणि राबवत असलेल्या मोहिमांबाबत सादरीकरण केले. डॉ. करमळकर यांनी पोलिस आयुक्तांच्या सुसंवाद या उपक्रमाचे कौतुक केले.

### मोठ्या अपघातांचे प्रमाण घटले

शहरात मोठ्या अपघातांचे प्रमाण घटत असल्याचे मे महिन्याच्या आकडेवारीवरून समोर आले आहे. फेब्रुवारीपासून मोठ्या अपघातांचे प्रमाण २३ टक्क्यांनी कमी झाले असून, येत्या वर्षात ते ५० टक्क्यांपर्यंत कमी करायचे आहे. त्यासाठी सर्वांनी वाहतूक व सुरक्षेचे नियम पाळण्याची आवश्यकता असल्याचे डॉ. व्यंकटेशम यांनी सांगितले. दरम्यान, वाहतुकीचे नियम स्वःहून पाळले पाहिजे. 'सीसीटीव्ही' कॅमेरांमार्फत हेल्मेट न वापरणाऱ्या दुचाकीस्वारांवर कारवाई करण्यात येईल, असेही डॉ. व्यंकटेशम यांनी सांगितले.



# नागरिकांच्या तक्रारी स्वीकारणाऱ्या पोलिसांना संवाद कौशल्याचे धडे

**प्रतिनिधी, पुणे**

**नागरिकांना येणाऱ्या** अडचणी, तक्रारी तसेच एखादी गंभीर घटना घडल्यानंतर नागरिकांकडून सर्वप्रथम पोलिसांच्या '१००' या क्रमांकावर संपर्क साधण्यात येतो. पोलीस नियंत्रण कक्षात (कंट्रोल रूम) नागरिकांकडून येणाऱ्या तक्रारी स्वीकारण्यासाठी नेमण्यात आलेल्या पोलिसांना नुकतेच संवाद कौशल्याचे धडे देण्यात आले.

पुणे पोलीस आयुक्तालयात आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेत पोलीस नियंत्रण कक्षात तीन सत्रात (ड्यूटी) काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना संवाद कौशल्याचे धडे देण्यात आले. नागरिकांच्या तक्रारी कशा स्वीकाराव्यात याची माहिती कार्यक्रमात देण्यात आली. एखादा नागरिक चिडलेला असली तरी त्याचे म्हणणे शांतपणे ऐकून घ्यावे, त्याला धीर देण्याचे काम करावे, तक्रारदाराला नाउमेद करू नये असे कार्यशाळेत सहभागी झालेल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सांगण्यात आले. तक्रारीचे स्वरूप, तक्रारदाराच्या बोलण्यातून व्यक्त होणारे भाव, त्याला कोणत्या स्वरूपाची मदत हवी आहे, याबाबत कशी चौकशी करावी, माहिती कशी घ्यावी, तसेच माहिती कशी द्यावी याचेही प्रशिक्षण देण्यात आले.

या उपक्रमासाठी शहरातील बांधकाम व्यावसायिकांची संघटना असलेल्या 'क्रेडाई'ने सहकार्य केले होते. क्रेडाईचे अनुज खरे, संजय देशपांडे, वन्य जीव संरक्षण सदस्य राजू पंडित, वनराईचे प्रशांत कोठडिया आदींनी कार्यशाळेत सहभागी झालेल्या पोलिसांना मार्गदर्शन केले. अतिरिक्त पोलीस आयुक्त सुनील फुलारी, सहायक पोलीस आयुक्त दीपक हुंबरे, पोलीस निरीक्षक क्रांती पवार, मनीषा झेंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

फुलारी म्हणाले की, पोलीस आणि नागरिकांमध्ये सुसंवाद असल्यास अनेक समस्या मार्गी लागतील. नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण कसे करावे तसेच त्यांच्याशी कशाप्रकारे संवाद साधावा, त्यांच्या अडचणी कशा समजून घ्याव्यात, याबाबतचे प्रशिक्षण या कार्यशाळेद्वारे मिळाले.

लोकमत – दि. ०९ जुलै, २०१९

# व्यापाऱ्याची ४ लाखांची बॅग सीसीटीव्ही मुळे परत

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** दुचाकीवरुन जाताना मध्ये ठेवलेली ४ लाख रुपये असलेली बॅग वाटेत पडली. फरासखाना पोलिसांनी शहरातील सीसीटीव्हीचे फुटेजची पडताळणी करुन या बॅगेचा शोध लावला व ती व्यापाऱ्याला परत केली. रस्त्यावरील बॅग उचलून ती मंदिरात ठेवल्याने ती जशीच्या तशी मिळून आली.

याबाबतची माहिती अशी, राजेश संपतराज पोरवाल (वय ४५, रा. सोमवार पेठ) हे दुचाकीवरुन बँकेत पैसे भरण्यासाठी जात होते. त्यावेळी त्यांनी ४ लाख रुपये असलेली बॅग दोन पायामध्ये ठेवली होती. रविवार पेठ, लोणार आळी, शितळादेवी मार्गे जाताना वाटेत त्यांची बॅग पडली. त्यांनी फरासखाना पोलिसांकडे धाव घेतली.



राजेश पोरवाल यांना बॅग परत करताना पोलीस उपायुक्त स्वप्ना गोरे.

पोलिसांनी या परिसरातील सर्व सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरु केली. त्यात लोणार आळीत रस्त्यावर पडलेली बॅग उचलताना एक व्यक्ती दिसत होता. पण त्याची ओळख पटत नव्हती. बॅग उचलणाऱ्या व्यक्तीचा मार्ग शोधत पोलिसांनी उंटाडे मारुती मंदिर, के ई एम हॉस्पिटल जवळ मदिराच्या कॅमेरात, बॅग उचलणार व त्याच्या गाडीचा नंबर स्पष्ट दिसून आला. त्यावर पोलिसांनी शेखर कृष्णा जावळकर (रास्ता पेठ) यांचा शोध घेतला. त्यांच्याकडे विचारपूस केली. त्याने शितळादेवी मंदिरात बॅग ठेवल्याचे सांगितले.

पोलिसांनी शितळादेवी मंदिर गाठले. मंदिरातील पुजारी शितल संजय परदेशी यांच्याकडे चौकशी केल्यावर त्यांनी बॅग जशीच्या तशी बाजूला ठेवली होती.

पोरवाल यांनी ती बॅग आपलीच असल्याचे सांगितले. रस्त्यावरील व खासगी सीसीटीव्हीच्या माध्यमातून या बॅगेपर्यंत पोहचण्यास पोलिसांना यश मिळाले. उंटाड्या मारुती मंदिराच्या खासगी फुटेजवरुन बॅग उचलणाऱ्याचा शोध घेण्यात आला.

पोलीस उपायुक्त स्वप्ना गोरे यांच्या हस्ते पोरवाल यांना ही बॅग परत देण्यात आली. सहायक पोलीस आयुक्त प्रदीप आफळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक किशोर नावंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक प्रतिक्षा शेंडगे, यशपाल सूर्यवंशी, विशाल चौगुले, आकाश वाल्मिकी यांनी ही कामगिरी केली.

The Indian EXPRESS - 28 July, 2019

# Police chief felicitates 29-yr-old who saved techie's life in road mishap

EXPRESS NEWS SERVICE
PUNE, JULY 27

THE PUNE City police felicitated 29-year-old Akash Dutt for helping a software engineer, who sustained injuries in a road mishap at Wagholi area in the early hours of May 29, 2019, and for saving his life.

The software engineer has been identified as Raghav Pratap Singh.

A press release issued by Police Commissioner K Venkatesham on Saturday stated that Dutt was going home after completing his work, when around 3 am he saw that a crowd had gathered around an injured person in Wagholi area.

Dutt found that a man had been injured in a road mishap and was lying in a pool of blood, stated the release. Despite making repeated appeals, nobody from the crowd gathered at the spot came forward to help the man, who was later identified as Raghav Pratap Singh.

However, Dutt managed to take help from a tempo carrying vegetables in the early hours of May 29.

He rushed the injured person to a hospital in Wagholi and also waited at the spot for a few hours as the doctors started treatment.

Police said Dutt's help saved life Singh's life, who works as software engineer.

Venkatesham, Joint Commissioner of Police Ravindra Shisve, Deputy Commissioner of Police (traffic) Pankaj Deshmukh felicitated Akash for his work in the presence of Singh.

Members Mona George, Reen George and Devendra Pathak, from Save Life Foundation were also present.



Pune Police Commissioner K Venkatesham felicitates Akash Dutt, on Saturday. *Express*

# राज्य राखीव पोलीस दल गट १ ला वनश्री पुरस्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : वानवडी येथील राज्य राखीव पोलीस दलाच्या गट क्रमांक १ ने वृक्षारोपणात केलेल्या भरीव कार्याची दखल घेऊन राज्य शासनाच्या महसूल आणि वनविभागाच्यावतीने राज्यस्तरीय छत्रपती शिवाजीमहाराज वनश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. वृक्षसंवर्धनाच्या कार्यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व्यक्ती आणि संस्था यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. यामध्ये राज्यस्तर आणि विभागस्तर असे दोन्हीमध्ये एसआयपीएफच्या गट क्रमांक १ ने द्वितीय क्रमांक पटकाविला आहे. राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे, स्मृतिचिन्ह व प्रशस्तिपत्र असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. अपर पोलीस आयुक्त सुनील फुलारी २०१७ मध्ये राज्य राखीव पोलीस दल गट क्रमांक १ चे तत्कालीन समादेशक म्हणून कार्यरत असताना त्यांनी त्या ठिकाणी विविध प्रकारच्या सुमारे ४ हजार वृक्षांची लागवड केली होती.

त्यातील सुमारे ९२ टक्के रोपे जगवली आहेत. यासाठी त्यांनी गटातील कर्मचाऱ्यांसोबतच विविध सामाजिक संस्थांची मदत घेतली होती. वृक्षांची योग्य पद्धतीने जोपासना व्हावी, यासाठी त्यांनी येथील जमिनीचा मृदासंवर्धनाच्या प्रकल्पापासून ते रेनवॉटर हार्वेस्टिंग, शेततळी यांसारखे प्रकल्प हाती घेतले होते. वडाचीवाडी हे गाव दत्तक घेऊन मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात आले.

या उपक्रमाचा भाग म्हणून त्याच कालावधीत त्यांनी दोन्ही ठिकाणची पक्षीगणना करून घेतली. त्यामध्ये २६ प्रकारच्या पक्ष्यांच्या विविध जातींमधील तब्बल १ हजार १५० पक्षी परिसरात आढळून आले होते. या विविध प्रकारच्या कामगिरीमुळे राज्य राखीव पोलीस दलाच्या गट क्रमांक १ ला हा पुरस्कार जाहीर झाला आहे.

सकाळ – दि. २२ जुलै, २०१९

# सुनील फुलारी यांच्या निसर्गसंवर्धनाची दखल

## राज्य सरकारकडून वनश्री पुरस्कार जाहीर



सुनील फुलारी

पुणे, ता. २१ : वृक्षारोपण, पर्जन्य जलसंचय, शेततळी आदींबाबत लोकसहभागातून भरीव कार्य केल्याबद्दल पुण्यातील उत्तर विभागाचे अतिरिक्त पोलिस आयुक्त सुनील फुलारी यांना राज्य सरकारचा वनश्री पुरस्कार जाहीर झाला आहे. राज्यस्तर आणि विभागस्तर, या दोन्ही गटांतून त्यांना पुरस्कार मिळाला आहे.

राज्य राखीव पोलिस दलाच्या गट क्रमांक एकचे २०१६-१८ समादेशक असताना फुलारी यांची रामटेकडी येथे नियुक्ती होती. त्याकाळात त्यांनी चार हजार रोपे लावली. त्यातील ९२ टक्के रोपांचे रूपांतर वृक्षांत झाले आहे. या कालावधीत त्यांनी वडाचीवाडी वृक्षलागवडीसाठी दत्तक घेतले. जलसंधारणामुळे तेथे पक्ष्यांच्या अधिवासात वाढ झाली. तेथे पक्षी गणनेत २६ जातींचे १,१५० पक्षी आढळले. याची दखल घेऊन राज्य सरकारने त्यांना पुरस्कार जाहीर केला आहे. एक लाख रुपये, प्रशस्तिपत्रक असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

लोकसत्ता – दि. २३ जुलै, २०१९

# पोलिसांच्या 'सेवा ॲप'ला विद्यार्थ्यांचे साहाय्य

प्रतिनिधी, पुणे

**नागरिकांनी दिलेल्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी पुणे पोलिसांकडून सुरू करण्यात आलेल्या सेवा ॲप कार्यप्रणालीला (सर्व्हिस फॉर व्हिक्टिम अस्टिटन्स) शहरातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहकार्य केले आहे. गेल्या काही दिवसांत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी २८ हजार नागरिकांशी संपर्क साधून त्यांच्या तक्रारी जाणून घेतल्या.**

गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात पोलीस आयुक्त डॉ. के. वेंकटेशम यांच्या संकल्पनेतून सेवा ॲप कार्यप्रणाली सुरू करण्यात आली. गेल्या आठवड्यापासून शहरातील विविध महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत कार्यरत असलेल्या विद्यार्थ्यांचे सेवा ॲपसाठी सहकार्य घेण्यात येत आहे. विद्यार्थ्यांनी शहरातील विविध पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केलेल्या नागरिकांशी संपर्क साधला. प्रायोगिक तत्त्वावर हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष पोलीस ठाण्याचे कामकाज तसेच कार्यपद्धतीबाबत माहिती मिळाली, असे अतिरिक्त पोलीस आयुक्त सुनील फुलारी आणि गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त बच्चन सिंह यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. सहायक आयुक्त दीपक हुंबरे, पोलीस निरीक्षक क्रांती पवार या प्रसंगी उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांकडून २८ हजार तक्रारदारांशी संपर्क




गेल्या दहा महिन्यात सेवा ॲप कार्यप्रणालीवर शहरातील १ लाख ९ हजार २६४ नागरिकांनी तक्रारी केल्या. त्यापैकी १ लाख १ हजार ४२ नागरिकांनी पोलिसांनी दिलेल्या सेवेवर समाधान व्यक्त केले. तसेच ३२ नागरिकांनी असमाधान व्यक्त केले. नागरिकांनी तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी तक्रारींचे स्वरूप जाणून घेतले. काही तक्रारी पोलिसांच्या कार्यकक्षेत येत नव्हत्या. त्यामुळे पोलिसांनी तक्रारदारांना तक्रारी दाखल करण्यासंदर्भात मार्गदर्शन केले. ज्या तक्रारी न्यायालयीन, महापालिका, वीजवितरण अशा यंत्रणेशी संबंधित होत्या, त्या यंत्रणांकडे कशी तक्रार करायची, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले, असे त्यांनी सांगितले.

## पोलीस दलाच्या कामकाजाचा अनुभव

प्रायोगिक तत्त्वावर विद्यार्थ्यांनी सेवा ॲप कार्यप्रणालीवर तक्रार देणाऱ्या नागरिकांशी संपर्क साधला. गेल्या काही दिवसात विद्यार्थ्यांनी २८ हजार नागरिकांशी संपर्क साधला. तक्रारी जाणून घेण्यासाठी विद्यार्थ्यांना नागरिकांचे क्रमांक उपलब्ध करून देण्यात आले. पोलीस ठाण्यातून विद्यार्थ्यांनी संपर्क साधला. या उपक्रमात शहरातील विविध महाविद्यालयातील २६० विद्यार्थी सहभागी झाले होते. या उपक्रमामुळे पोलिस ठाण्याचे कामकाज कसे चालते तसेच नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधून नेमक्या कोणत्या स्वरूपाच्या तक्रारी आहेत, याची माहिती मिळाली, असे शिवानी मुळे, वैष्णवी पाटील, सोहेल सय्यद, स्वप्नील पवार या विद्यार्थ्यांनी सांगितले.

# Bharosa Cell saves 435 juveniles from a life of crime in 6 months

ST CORRESPONDENT
reporters@sakaaltimes.com



**PUNE**

Since the inception six months ago of the Bharosa Cell (Cops' Hub) at the Police Commissioner's Office, the Special Juvenile Protection Unit has counselled 435 juveniles in conflict with the law to steer them towards a better life. The cell, which is the brainchild of Police Commissioner Dr K Venkatesham, was inaugurated by CM Fadnavis on January 9 this year. The cell is divided into three units to resolve grievances of senior citizen, women and children. The cell has got a panel of counsellors, psychologists, lawyers, social workers and police officers.

The Bharosa Cell, along with NGOs Life School Foundation and Pankh Foundation, have conducted 25 meetings at the police station-level and nine at divisional-ACP level.

Continued on P2

# Bharosa Cell saves 435...

A total of 435 juveniles and 135 parents were counselled in these last six months.

According to Bharosa Cell officials, the children are counselled so they lose criminal habits and stay away from bad company and get educated. Their parents are counselled to behave properly with their wards and stop their addiction. The officials keep track of these juveniles to wean them away from criminal elements and crimes. The officials said there were 90 children - both boys and girls – whose parents brought them to the unit for counselling as they were not behaving properly, left school, or were addicted to mobile phones or other substances.

The Indian EXPRESS - 30 July, 2019

# A Pune Police initiative, Buddy Cop rolled out across Maharashtra

SRINATH RAO
MUMBAI, JULY 29

AN INITIATIVE unveiled by the Pune Police two years ago to ensure the safety of women working night shifts at call centres and software companies has now been rolled out across the state. Under the project, 10 police personnel at each police station will be appointed Buddy Cops to 100-150 working women each.

Maharashtra DGP Subodh Kumar Jaiswal issued orders last month directing all police commissionerates and districts in the state to standardise the operation of eight initiatives aimed at citizen awareness and the safety of women and senior citizens. These are part of 67 community policing programmes active in different parts of the state aimed at diverse target groups.

The Buddy Cop project was started by then Pune Police Commissioner Rashmi Shukla in mid-2017 following the murders of Antara Das and Rasila Raju OP within the span of a month between December 2016 and January 2017. Jaiswal sees the project as being vital "to prevent such incidents in future and to provide a sense of security to working women".

The project will be made operational at police stations which have industries and IT hubs in their jurisdictions. Under the project, personnel ranking between Constable and Assistant Sub Inspector will be made available round-the-clock to respond to emergencies reported by women working in offices and banks and living in hostels. They are also required to create a WhatsApp group comprising 100-150 women, the senior inspector of the police station and local beat constable. While women will be able to report emergencies and seek assistance through text messages and phone calls, the Buddy Cops will be required to attend to emergency situations personally.

In Pune, the project was initially rolled out in Hinjewadi, Yerawada, Kharadi and Hadapsar, which have a large number of private companies employing women.

Shukla fast-tracked the project after Capgemini employee Antara Das was stabbed to death on December 23, 2016 in Talawade. A fellow software engineer was arrested for her murder. A month later, a security guard allegedly stabbed and killed software engineer Rasila Raju OP inside the Infosys campus in Hinjewadi.

# ‘वाईटाची कराल संगत तर जेलमध्ये मिळेल पंगत’

**पुणे : प्रतिनिधी**

वाहतूक शिस्त आणि वाहतुकीबाबत जनजागृती करण्यासाठी काही दिवसांपूर्वी पोलिसांनी पुणेरी पाट्यांची संकल्पना अंमलात आणली. या पाट्या आयुक्तालयात झळकत आहेत. ‘वाईटाची कराल संगत, तर जेलमध्ये मिळेल पंगत’ यासारख्या पाट्या लक्षवेधक ठरत आहेत. आता आणखी पाट्या तयार करून त्या लावल्या जाणार असून, त्यासाठी मजकूर पाठविण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

पुढारी अँकर

या मजकुरांच्या पाट्या तयार करून त्या ठिकठिकाणी लावण्यात येणार आहेत. पोलिस आयुक्त डॉ. के. वेंकटेशम यांच्या संकल्पनेतून या पाट्या तयार करण्यात आल्या.

त्यानंतर आयुक्तालयाच्या मुख्य प्रवेशद्वारात या पाट्या आकर्षक पद्धतीने लावण्यात आल्या आहेत. आयुक्तालयात काम घेऊन येणाऱ्या नागरिकांचे लक्ष या पाट्या खेचत आहेत. वाहतूक नियम तसेच जनजागृती करणाऱ्या खोचक शैलीतील पुणेरी पाट्या लावण्यामागे उद्देश आहे.

नको बंड, नको दंड, हेल्मेट घालून डोके ठेवा थंड’, ‘पुरुष आणि




स्त्री असा कोणताही भेद नसलेले सेल म्हणजे भरोसा सेल’, ‘नियमांचे सत्य कायम टोचत असते. कारण त्यामध्ये एक पॉइंट असतो,’ ‘हेल्मेट नसे त्यासी यमराज दिसे’, ‘वाइटाची कराल संगत तर जेलमध्ये मिळेल पंगत,’ अशा आशयाच्या पाट्या पोलिस आयुक्तालयात येणाऱ्या नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहेत.

आता आयुक्तालयाबरोबरच शहरातील वेगवेगळ्या भागात असणाऱ्या पोलिसांच्या कार्यालयात पुणेरी पोलिस पाट्या बसविण्यात येणार आहेत. या पाट्यांसाठी मजकूर पाठविण्यासाठी आवाहन करण्यात आले आहे. याबाबतची माहिती पोलिस नियंत्रण कक्षातील व्हॉटसअ‍ॅप क्रमांकावर (मोबाइल क्रमांक-८९७५२८३१००) पाठवावी. शहरात असलेल्या उत्कृष्ट पुणेरी पोलिस पाट्यांबाबत माहिती द्यावी, असेही आवाहन केले आहे.

## डॉ. सलील कुलकर्णी : शिष्यवृत्ती वाटप व परीक्षकांचा कृतज्ञता सोहळा

# कष्ट केल्यासच अभ्यास होतो

लोकमत न्यूज नेटवर्क

*पुणे : मी आहे शाम, मित्र माझा राम, मी जातो शाळेमध्ये राम्या करितो काम...*

अशी गाणी आणि कविता सादर करत, अभ्यास एसी मध्ये बसून होत नाही तर कष्ट केला तरच होतो, असा सल्ला गायक व संगीतकार डॉ. सलील कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना दिला.

पुणे पोलीस आणि विघ्नहर्ता न्यासतर्फे आयोजित शिवाजीनगर पोलीस मुख्यालयात विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप व परीक्षकांचा कृतज्ञता सोहळ्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम होते.

या वेळी पोलीस सह आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे, विघ्नहर्ता न्यासचे विश्वस्त डॉ. मिलिंद भोई, राजीव साबडे, प्रताप निकम, हेमचंद्र मासुलकर, जगदीश चिंचोरे आदी उपस्थित होते. श्रुती चव्हाण, वैष्णवी लोळगे, अक्षता पाटील अशा एकूण दोनशे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले. चारही पोलीस परिमंडळाचे पोलीस अधिकारी आणि परीक्षक आणि समन्वयकांना प्रमाणपत्र देण्यात आले. विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले.

पोलिसांच्या खाकी वर्दीच्या आत एक संवेदनशील माणस लपलेला असतो. सर्वात वेगवेगळे प्रसंग, घटना पाहणारे ते असतात. ज्यांना मदत मिळते त्यांनी पुढे जाऊन मदत केली पाहिजे. त्या वेळी मदतीचे वर्तुळ पूर्ण होते, असे मत त्यांनी व्यक्त केले.

पुढे ते म्हणाले, स्कूल बॅग ही एक मोठी जबाबदारी असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी नेहमी ध्येय मोठे ठेवले पाहिजे. पोलिसांची अशी शिष्यवृत्ती मला वाचनासाठी मिळायला हवी, अशी मिस्कील मागणी या वेळी त्यांनी केली.

सूत्रसंचालन डॉ. मिलिंद भोई यांनी केले. प्रास्तविक पोलीस उपायुक्त स्वप्ना गोरे यांनी केले, तर आभार पोलीस उपायुक्त मितेश घट्टे यांनी मानले.



पुणे पोलीस आणि विघ्नहर्ता न्यासतर्फे आयोजित शिवाजीनगर पोलीस मुख्यालयात विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप करताना डॉ. के. व्यंकटेशम. समवेत डॉ. सलील कुलकर्णी व इतर मान्यवर.

"विघ्नहर्ता न्यास गणेशोत्सवात पोलिसांना मदत करण्याचे काम करते. १९९४ पासून न्यास विद्यार्थ्यांसाठी काम करत असल्याचे सांगितले. लहान ध्येय ठेवणे हा गुन्हा आहे. हा डॉ. कलामांचा दाखल देत विद्यार्थ्यांनी नेहेमी मोठे ध्येय ठेवले पाहिजे, असे सांगितले.

— डॉ. व्यंकटेशम, पोलीस आयुक्त

### ...म्हणून तो डोळ्यांत साठवला

- सलील कुलकर्णी म्हणाले, माझ्यामध्ये लहान मूल आहे. एवढ्या प्रमाणात एकत्र आलेले पोलीस मी कधी पाहिले नाहीत. येथे आलेली मुलं नशीबवान आहेत. एका वेळी असे पोलीस अधिकाऱ्यांना पाहता येणारा क्षण आयुष्यात प्रोत्साहन देणारा ठरतो. म्हणून तो डोळ्यांत साठवला पाहिजे.

"दहावीत मिळालेल्या यशात आई-वडिलांचा जसा वाटा आहे तसाच विघ्नहर्ता न्यासाचाही वाटा आहे. गेल्या तीन वर्षापासून शिष्यवृत्ती मिळत असल्याने आर्थिक मदत होतेच. त्याचबरोबर न्यासाकडून प्रोत्साहनही मिळत आहे.

— श्रुती चव्हाण

"दहावीत स्वभ्यास करुन गुण मिळाले आहेत. न्यास शिकण्यासोबतच आरोग्याचीही काळजी घेत आहेत. यामुळे आमच्या सारख्या आर्थिक दृष्टीने दुर्बल असलेल्या विद्यार्थ्यांना याचा उपयोग होत आहे. पुढे जाऊन डॉक्टर व्हायचे आहे.

— अक्षता पाटील